मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३६५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी शिवसेनेचे जालन्यात आक्रोश आंदोलन

## गंभीर आरोपानंतरही राजीनामा न घेणे ही सत्ताधाऱ्यांची हतबलता - अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील कलंकित व वादग्रस्त मंत्र्यांनी तातडीने राजीनामा द्यावा या मागणीसाठी जालना जिल्हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तर्फे आज महात्मा गांधी चमन येथे आक्रोश व धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत भ्रष्टाचार आणि गैरवर्तन करणाऱ्या मंत्र्यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली. यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, जिल्हा संघटक भानुदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, तालुकाप्रमुख हरिहर शिंदे, जयप्रकाश चव्हाण, प्रदीप बोराडे, पंडित गावडे, शहरप्रमुख बाला परदेशी, दुर्गेश काठोटीवाले, दीपक रणनवरे, भारत पंडित, गंगुताई वानखेडे, बाबुराव कायंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, मागील अनेक महिन्यांपासून महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री बेजबाबदारपणे वागून वादग्रस्त विधाने करीत आहेत. तर अनेकांचे भ्रष्टाचार उघडकीस आले आहेत. तरीही त्यांचे राजीनामे घेतले जात नाहीत हे अत्यंत दुर्दैवी आहे. ज्या गृहमंत्र्यांची डान्सबार बंद करण्याची जबाबदारी आहे तेच डान्सबार चालवत आहेत,

कृषी मंत्री शेतकर्यांची हेटाळणी करीत आहेत, समाज कल्याण मंत्री समाजाच्या ऐवजी स्वतःचे कल्याण करण्यातच मग्न आहेत, एकीकडे राज्यात अंधश्रद्धे विरोधातील कायदा असताना राज्य मंत्रिमंडळातील मंत्रीच सत्तेसाठी जादूटोणा करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी चित्र राज्यात दिसत आहे. या राज्याला अत्यंत उच्च दर्जाच्या व सुसंस्कृत राजकारणाची परंपरा आहे. अत्यंत छोट्या छोट्या आरोपांमुळे तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, ए.आर. अंतुले, शिवाजीराव निलंगेकर, तत्कालीन गृहमंत्री आर.आर.पाटील या व्यक्तींना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना तत्कालीन मंत्र्यांवर आरोप झाल्याने त्यांनाही शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पदावरून काढले होते. परंतु आज मात्र अनेक आरोप होऊनही मंत्र्यांचा राजीनामा होत नाही. त्यांचा राजीनामा घेतला जात नाही. यातून सरकारची हतबलता दिसून येते. अशा भ्रष्ट मंत्र्यांचे राजीनामे न झाल्यास हे मंत्री असेच निर्ढावल्यासारखे वागतील. करिता आता जनतेनेच याबाबत विचार करून त्यांना धडा शिकवणे गरजेचे असल्याचे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी व्यक्त केले.

यावेळी उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, जिल्हासंघटक भानुदास घुगे, तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे, यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी युवासेना शहरप्रमुख दर्शन चौधरी, किशोर नरवडे पंडित क्षीरसागर, जनार्दन गिराम, सुरेश वाघमारे, सखावत पठाण, ऋषिकेश खिरे, अनंता वैद्य, सखाराम घोलप, प्रभाकर उगले, जनार्दन गिराम, सुरेश वाघमारे, विजय बोरुडे,योगेश जाधव, अजय रोडीये, विठ्ठल पाऊलबुद्धे, जीवन खंडागळे, सोनाजी खांडेभराड, राज इंगळे, संतोष क्षत्रिय, गणेश लाहोटी, मदन खरात, पांडुरंग काळे, प्रभाकर ब्राह्मणे, अभिमन्यू खापरे, रजनीश कणके, बाळासाहेब गावडे, जनार्दन रेगुडे, सुनील चौधरी, किरण तुम्मा, तुकाराम भुतेकर, विजय बोरुडे, बळीभाऊ खैरे, बाबासाहेब खांडेभराड, सचिन चव्हाण, दिगंबर बोरुडे, प्रभाकर शिंदे, सर्जेराव कायंदे, मच्छिंद्र शेळके, संदीप राठोड, श्याम चव्हाण, परमेश्वर खैरे, सतीश डूम, अनिल दहिजे, गणेश दराडे, बाळाभाऊ सदावर्ते, राजेंद्र कोटेचा, अनिस पठाण, सादिक मिर्झा, गणेश तरासे, शेख राहील, वसीम पठाण, अब्दुल नईम, गजानन गिराम, सचिन नागरे, कैलास मिसाळ, सादिक मीर्झा, राहिल भाई, सुनील तोडकर, नितिन गुमरे, शेख ईमताज, शेख नईम, अजय रोडिया, सादिक मिर्झा, राहील मणियार, नितीन गमरे, सुनील तोडकर, शेख इम्तियाज आदींची यावेळी उपस्थिती होती.



युवा आदर्श

### गुजगोष्टी ...

**खरा झाला हल्ला**
**हवी म्हणतात पुष्टी**
**कपोल कल्पित या**
**वाटे काहींना गोष्टी**
**सैनिकांचा पराक्रम**
**कौतुकात पुष्पवृष्टी**
**मनो उदात्तीकरणाने**
**जरा बदले अंतर्दृष्टि**
**नको अशा कुशंका**
**मन होई दुःखीकष्टी**
**एन केन प्रकारेण रे**
**उडवू पाहतात यष्टी**
**कशास द्यायचे पुरावे**
**किती करी अन्वेष्टि**
**अवनत करे मनोबल**
**कृत्ये अशी अशिष्टि**
**सनसनाटी आरोपाने**
**सातत्याने अतिवृष्टी**
**मन अस्वस्थ कशांस**
**कधी व्हायची संतुष्टी**
**विश्व हे अवघे पाहते**
**देशव्यापी रे दूर दृष्टी**
**नितळ मनाने पहावे**
**विलोभनीय ही सृष्टी**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

# महसूलमंत्री बावनकुळेंच्या निर्णयामुळे ॲड. मगरे यांच्या आंदोलनाला यश - अभिमन्यू खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सकारात्मक निर्णयामुळे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांच्या भुमिहिन, कास्तकर, आदिवासी यांच्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला यश आले असल्याचे युवासेनेचे अभिमन्यु खोतकर यांनी सांगितले. शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना तालुकास्तरीय दलित आदिवासी भूमिहीन कास्तकार मेळावा ११ ऑगस्ट रोजी घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मेळाव्याचे उद्घाटक युवा सेना म.रा.सचिव अभिमन्यू खोतकर, दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे, अण्णासाहेब बाळराज, जय खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अभिमन्यू खोतकर म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील दलित आदिवासी भूमिहीन शेतजमिनी नावे करून सातबारा देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे जालना जिल्ह्यात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी गेले अनेक वर्षापासून जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष केला आहे. त्या संघर्षाला आज यश आलेले आहे. ॲड. भास्कर मगरे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, शिवसेना दलित आघाडी गेली अनेक वर्षापासून जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करत आहे हे आंदोलन कायदेशीर मार्गाने असल्यामुळे आतापर्यंत या आंदोलनात लाभार्थ्यांची संख्या वाढत गेली. शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० या दरम्यान महाराष्ट्रातील दलित

**पान २ वर**

# रोहित पाचफुले यांना राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार प्रदान



**जालना । प्रतिनिधी -** समाजसेवेचा निस्वार्थ ध्यास आणि सातत्याने जनहितासाठी कार्य करणारे जालना शहरातील युवा समाजसेवक रोहित मनोजराव पाचफुले यांना अहिल्यानगर येथील अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्थेतर्फे रविवार, दि. १० ऑगस्ट रोजी भव्य सोहळ्यात आ. संग्राम जगताप व युवा नेते तुषार बोरुडे यांच्या हस्ते महाराष्ट्र रत्न आदर्श समाजसेवक पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय वीर शिवछत्रपती महाराष्ट्र रत्न पुरस्कार व अजिंक्य तारा पुरस्कार प्रदान सोहळ्यात रोहित पाचफुले यांना महाराष्ट्र रत्न आदर्श समाजसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांच्यासमवेत वडील आणि भाजपा व्यापारी आघाडीचे महानगराध्यक्ष मनोजराव पाचफुले, काका प्रवीण पाचफुले, विनोद पाचफुले, व्यंकटेश नागवे, मोसिन पठाण, साईराज पाचफुले उपस्थित होते. शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे या प्रकाराचे स्वरूप आहे. शिक्षण क्षेत्रात वंचित विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आरोग्यविषयक शिबिरे, महिलांसाठी जागृती मोहिमा, पर्यावरण संवर्धन उपक्रम, तसेच गरजूंना तातडीने दिलासा देण्याच्या उपक्रमांमध्ये रोहित पाचफुले यांचे कार्य विशेषत्वाने ठळक राहिले

**पान २ वर**

# जालना बांधकाम कामगार कार्यालयात लाखोंचा भ्रष्टाचार!

## मृत बांधकाम कामगारांच्या नावावर खोटे दाखले, १४ ऑगस्टपर्यंत कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा बांधकाम कामगार कार्यालयात मृत बांधकाम कामगारांच्या नावावर खोटे दाखले तयार करून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. यामध्ये कार्यालयातील अधिकारी, दलाल व कॉमन सर्विस सेंटर (सीएससी) चालक यांच्या संगनमताचा आरोप करण्यात आला असून या प्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे.

तक्रारदार अर्जुन सुभाषराव कणसे यांनी जिल्हाधिकारी जालना तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अधिकारी अमोल जाधव यांनी दलालांशी संगनमत करून मृत बांधकाम कामगारांच्या नावावर वारसांना मिळणाऱ्या ५० हजार व २० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे खोटे प्रस्ताव तयार केले. मृत्यू प्रमाणपत्रे आणि आधार कार्डांची प्रत सीएससी सेंटरमार्फत अपलोड करून हे प्रस्ताव मंजूर करून घेतल्याचे आरोप आहेत.

यातून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा दावा करण्यात आला असून, प्रत्यक्षात लाभार्थी कुटुंबांना पैसे मिळाले नाहीत. एवढेच नव्हे, तर मुलांच्या शिष्यवृत्ती योजनेतही कटकारस्थान करून निधी लाटल्याचा आरोप आहे.

तक्रारदारांनी म्हटले आहे की, काही प्रकरणांमध्ये मृत्यू झाल्यापासून ९० दिवसांचा कालावधी उलटूनही नियमबाह्यरीत्या मंजुरी देण्यात आली. ग्रामसेवक व मंडळ अधिकाऱ्यांच्या संमतीने तयार करण्यात आलेले हे प्रस्ताव कार्यालयातील अधिकाऱ्यांनी माहिती असूनही मंजूर केल्याचा दावा करण्यात आला आहे.

१४ ऑगस्टपर्यंत कारवाईचा अल्टिमेटम

या प्रकरणातील सर्व संबंधित अधिकारी, दलाल व सीएससी सेंटर चालकांविरोधात १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत फौजदारी गुन्हे दाखल करून चौकशी न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा अर्जुन कणसे यांनी दिला आहे.

हा प्रकार जिल्हा बांधकाम कामगार कार्यालयातील कामकाजावरील विश्वासघातक आहे, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. आता प्रशासन व शासनाची पुढील कारवाई काय होते, याकडे जिल्ह्यातील कामगार व नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## संपादकीय

### हत्ती वाचवा

जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो. हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमाणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अख्यातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे. हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शेतकरी स्वातंत्र्यासाठी निवडणूक पद्धतीत सुधारणा आवश्यक

जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबित राहतात. ते सुटत नाहीत. लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करतात. त्यांना माहीत असते की, हे प्रश्न सोडवण्याचा आणि निवडून येण्याचा काही एक संबंध नाही. निवडणूक पद्धतीचे गणित आज लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या एकमेकांच्या हितसंबंधांच्या विरुद्ध झाले आहे. ही चिंतेची बाब आहे.

आम्हाला वाटते की, शेतकरीविरोधी कायदे रद्द झाले तर देश बलवान होईल. ते रद्द व्हावे म्हणून आम्ही चळवळ करतो. शेतकरीविरोधी (सीलिंग, आवश्यक वस्तू, अधिग्रहण, आदी) कायदे कोण रद्द करणार? विधानसभा आणि लोकसभा. कारण हे दोन्ही सभागृह कायदे मंडळ आहेत. संविधानाने त्यांना 'विधी मानलं ' म्हटले आहे. पण गेली दहा-बारा वर्षे आम्ही सातत्याने आवाज उठवत असलो तरी विधानसभा, लोकसभेत काही त्याचे पडसाद उमटतात नाहीत. अजिबात नाहीत. महाराष्ट्राच्या विधान परिषेतेत खाजा बेग आणि सदाभाऊ खोत यांनी तेवढा उल्लेख केला. या दोघांच्या वक्तव्याची सरकारी पक्षाने घ्यावी तशी दखल घेतली नाही. पुन्हा सामसूम झाले.

कायदे मंडळात जाणारेच जर बेकायदेशीर रीतीने, षडयंत्र आणि संगनमत करून जात असतील, तर तेथे दुबळ्यांचा आवाज कसा पोचेल? तेथे न्यायाची बाजू घेऊन कायद्यांचा विचार कोण करेल? चळवळीचे मुद्दे संसदेच्या दाराबाहेर, कधी जंतरमंतरवर तर कधी आजाद मैदानावर जाऊन मरतात. हे चळवळीचे मफन कसे थांबेल? जनता आणि संसद एकत्र येऊन देश कधी घडवतील? खऱ्या लोकशाहीची प्रस्थापना कधी होईल?

भारताच्या लोकशाहीला लागलेले ग्रहण दूर करायचे असेल तर सर्वप्रथम निवडणूक पद्धतीत सुधारणा कराव्या लागतील. निवडणूक आयोग स्वायत्त असला पाहिजे, सत्ताधाऱ्यांची सोय पाहणारा असता कामा नये, मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, ह्या गोष्टी मूलभूत आहेत. ही सुरुवात आहे. आज निवडणूक आयोग सरकारचा बटीक बनला आहे. असे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. मतदार याद्या सदोष आहेत, मतदान प्रक्रियेचे व्हिडीओ नष्ट केले जात आहेत, या गोष्टी लोकशाही विरोधी आहेत. हा जनता द्रोह आहे.

या निमित्ताने निवडणूक सुधारणा बद्दल आपण विचार करू. निवडणूक सुधारणा झाल्या शिवाय बदलत्या भारताच्या आकांशा पूर्ण होणार नाहीत. ७५ वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर आपण निवडणूक सुधारणासाठी काय सुचना करू शकतो? मी पुढील सुचना चर्चेसाठी मांडल्या आहेत.

राजकीय पक्ष वा सरकारी नोकरांची सोय न पाहता केवळ १) मतदारांच्या सोयीचे काय आहे, २) खऱ्या लोक प्रतिनिधींच्या हातात कारभार कसा जाईल, हे दोन निकष समोर ठेवून या सूचना केल्या आहेत.

**मतदान सप्ताह-**

आपल्या देशात मतदाराला मतदानासाठी एकच दिवस दिला जातो. हजारो मतदान केंद्रे उघडली जातात. त्यावर हजारो कर्मचारी तैनात केले जातात. मतदारांच्या रांगा लागतात. सगळे घाई घाईत केले जाते. म्हणजे आपल्या देशात मतदान 'उरकले' जाते. एका दिवसात मतदान घ्यायचे असल्यामुळे कर्मचारी मोठ्या संख्येने लागतात. पोलिसांवर ताण पडतो. एक दिवसात मतदान होत असल्यामुळे राजकीय पक्ष 'भावना भडकावण्याचा' खेळ खेळू शकतात. गैरसमज पसरवू शकतात. उमेदवारांना प्रचारासाठी पंधरा दिवस देता, तसे मतदारांना मतदानासाठी आठ दिवस का नाही? असा माझा साधा प्रश्न आहे.

मतदान सप्ताह केला तर लोकाना त्यांच्या सोयीनुसार मतदान करता येईल. निवडणुकीसाठी सुट्टी जाहीर करण्याची (जिचा लाभ फक्त सरकारी-नीम सरकारी कर्मचाऱ्यांनाच होतो) आवश्यकता पडणार नाही. सलग आठ दिवस मतदान असल्यामुळे मतदान केंद्रांची संख्या मर्यादित ठेवता येईल. मतदानाचे प्रमाण वाढेल. मतदानाचे प्रमाण वाढल्यास निवडणुकीतील पैसा वाटपाचा प्रभाव कमी होईल. मतदानाचा कालावधी वाढल्याने राजकीय पक्षांना ताण वाढू शकतो. अर्थात लोकशाहीत मतदारांची सोय पाहणार कि राजकीय पक्षांची?

अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीचे मतदान अनेक दिवस चालते. आपल्या सरकारी कचेऱ्यात मतपेट्या ठेवल्या तर आपणही जास्त दिवस मतदान चालवू शकू. ज्या कार्यालयात पैशाची तिजोरी ठेवली जाऊ शकते तेथे मतपेटीच्या सुरक्षिततेची चिंता करण्याचे कारण नाही. या मतपेट्या इंटरनेटशी जोडल्या तर त्यातील डाटाही सुरक्षित राहू शकतो. मतदानासाठी अधिक कालावधी देणे सुदृढ लोकशाही साठी आवश्यक आहे.

**दोन कार्यकाळ पुरे**

एक व्यक्ती दोन कार्यकाळ (टर्म) पेक्षा जास्त काळ एका पदावर राहू शकणार नाही. अशी तजवीज करायला पाहिजे. अमेरिकेचा अध्यक्ष दोन टर्मपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही. आपल्या देशात अशा तजविजीची जास्त गरज आहे. या कायद्यामुळे कोणाही व्यक्तीची सत्तेत मक्तेदारी निर्माण होणार नाही. जास्त लोकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होता येईल.

**प्राधान्यक्रम-**

उमेदवार निवडीसाठी आपल्याकडे 'बहुमत' पाहीले जात नाही. 'सर्वाधिक मत' पाहीले जाते. बहुमत आणि सर्वाधिक मत यात फरक आहे. त्यामुळे ५० टक्के पेक्षा कमी मत मिळवणारा उमेदवार अनेकदा निवडून येतो. अनेकदा नव्हे, सामान्यपणे सर्वाधिक मते घेणाराच विजयी घोषित केला जातो. ही लोकशाहीची चेष्टा आहे. खरी लोकशाही रुजवायची असेल व खऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातात सत्ता द्यायची असेल तर 'प्राधान्यक्रम' पद्धत स्वीकारावी लागेल. प्राधान्यक्रम पद्धतीत मतदारांना आपल्या पसंतीचा क्रम नोंदविता येतो. पहिल्या फेरीत ५० टक्के मतदान कोणालाच मिळाली नाहीत तर दुसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. जगातील अनेक लोकशाही देशात याच पद्धतीचा अवलंब केला जातो. आपल्याकडे विधान परिषद व राज्यसभेचे उमेदवार निवडताना या पद्धतीचा वापर केला जातो. लोकसभा, विधान सभा व पंचायत राजसाठी 'प्रधान्यक्रम' पद्धत स्वीकारणे काळाची गरज ठरली आहे. कारण हल्ली मतविभाजन करून, मटविभाजनासाठी खोटे उमेदवार उभे करून लोक निवडून येऊ लागले आहेत.

'प्राधान्य क्रम' पद्धत लागू झाली तर कर्मचार्यांवर ताण पडू शकतो. निकालाला उशीर होऊ शकतो, पण खरे लोकप्रतिनिधी निवडून येण्याची शक्यता वाढते, हे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त महत्वाचे आहे.

**मतदार संघांची रचना-**

मतदार संघांची जी रचना आपण स्वीकारली आहे, ती इंग्लंड मधील 'हाउस ऑफ लॉर्डस' सारखी आहे. ती कालबाह्य आणि निरुपयोगी झाली आहे. लोकसभा आणि विधान सभा ही कायदे मंडळे आहेत. लोक प्रतिनिधींनी तेथे जाऊन कायदे बनवावेत अशी अपेक्षा असते. मतदार संघातून निवडून आलेल्या बऱ्याच जनांना राज्य व राष्ट्रीय प्रश्न माहितच नसतात, किंवा त्या वरील उपाय सांगता येईल एवढा अभ्यास नसतो. म्हणून पुष्कळ लोकप्रतिनिधी कायदा बनविण्याच्या कामात प्रभावी ठरत नाहीत. यासाठी तीन स्तरावरील लोकप्रतिनिधी कायदे मंडळात जातील अशी सोय करावी लागेल. १) स्थानिक (५०) २) राज्य (२५) ३) राष्ट्रीय (२५) अशा प्रकारचे तीन स्तरावरील मतदार संघ तयार करावे लागतील.

तीन मतदार संघांचा मिळून एक स्थानिक मतदार संघ तयार करावा. मतदारांना तीन प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असेल. १) अनुसूचित जाती- जमाती २) महिला व ३) खुला. या पद्धतीने ३३ टक्के आरक्षणाचा प्रश्न सुटू शकेल. स्थानिक प्रतिनिधित्व राहील.

सभाग्रहातील ५० टक्के प्रतिनिधी स्थानिक मतदार संघा मधून निवडून आलेले असतील. उदाहरणार्थ लोकसभेत ५५० जागा आहेत. त्यातील २७५ उमेदवार स्थानिक मतदार संघातून निवडून येतील.

सभागृहातील २५ टक्के जागा ह्या राज्य स्तरावर व २५ टक्के जागा राष्ट्रीय स्तरावरील मतदार संघातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीसाठी राहतील. राज्य स्तरीय मतदार संघ म्हणजे पूर्ण राज्य एक मतदार संघ मानला जाईल. तसेच राष्ट्रीय म्हणजे संपूर्ण देश हा मतदार संघ मानला जाईल. राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावरील प्राधान्य क्रम पद्धतीने ५०हूं अधिक मते घेणारे सभागृहाचे सभासद होऊ शकतील. विधानसभेत देखील याच तत्वावर उमेदवार निवडले जातील.

सध्याच्या पद्धतीत जाती-धर्माचा वापर करून, पैसा वापरून लोक निवडून येऊ शकतात. राज्य आणि राष्ट्र मतदार संघातून निवडून येण्यासाठी तेवढे काम करावे लागेल. चळवळीच्या लोकांना व्यापक मुद्द्यासाठी सभागृहात जाण्याची संधी मिळू शकते.

**निवडणूक कायदे ठरविण्याचा अधिकार-**

निवडणूक विषयी कायदे ठरविण्याचा अधिकार केवळ संसदेला असू नये. त्यासाठी विविध वैधानिक व स्वायत्त संस्थाना एकत्र करून गठीत केलेल्या आयोगाला असावा. या आयोगसातील लोक निवडणूक लढवणार नाहीत. खेळाळूंच्या संघाने खेळाचे नियम ठरवू नये तसे निवडणुकीचे नियम संसदेने ठरवू नये. आज संसद निवडणूक पद्धत व नियम ठरवत असल्यामुळे त्यात बदल होत नाहीत. सत्ताधारी त्यांच्या सोयीचे पाहतात. नव्या व्यवस्थेत स्वायत्त संवैधानिक आयोगाला असे अधिकार द्यावेत.

शेतकरी विरोधी कायदे रद्द करणे काळाची गरज असताना देखील ते रद्द केले जात नाहीत. कारण आजच्या निवडणूक पद्धतीत शेतकरीविरोधी कायदे कायम सडवणे सत्ता ताब्यात येण्यासाठी व ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांना आवश्यक वाटते. सत्ता आणि जनता यांच्यात प्रचंड दरी निर्माण झाली आहे. ही दरी कमी करण्यासाठी निवडणूक पद्धत बदलणे अत्यंत आवश्यक ठरले आहे.



**अमर हबीब,**
**आंबाजोगाई**
**किसानपुत्र आंदोलन**
**मो. ८४११९०९९०९**

# युवाशक्तिला विधायक वळण आवश्यक

आज एकूण राजकीय परिस्थिती बघितली तर सैरभैर झालेली आहे. सत्तेसाठी राजकारण कसे सुरु आहे हे आपण बघतच आहे. आणि त्यात महत्त्वाचे प्रश्न जसे बेरोजगारी,वाढती व्यसनाधीनता हा युवकांसमोरचा महत्त्वाचा प्रश्न आहे तो मात्र बाजूला पडत आहे. जसे शिक्षित युवक आहे त्यासमोर नोकरीचा प्रश्न आहे तसेच जो शिक्षित नाही परंतु शेती या फार मोठ्या व्यवसायात गुंतलेला आहे त्याच्या डोळ्यासमोर शेती पिकवणे आणि ती टिकवून ठेवणे यातच तो गुरफटला आहे, त्याचीही अनेक प्रश्न आहे ते सुद्धा बऱ्याच अंशी दुर्लक्षित राहतात.

आपण म्हणतो देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा तरुणांचा- युवकांचा देश आहे.भारतात पासष्ट टक्के युवकांची संख्या आहे,असे म्हटले जाते.युवापिढीचे क्षमतेवर, ताकतीवर भारतही जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे. आजच्या परिस्थितीत काही ठरावीक युवा पिढीत नवीन शिकण्याची आवड आहे, जिद्दही आहे.देशाच्या विकासात त्यांचा सहभाग आहे.आज देशाच्या सीमेवर जाऊन आपल्या देशाच्या रक्षण करणारा देशभरातील युवकच आहे.त्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

जागतिक स्तरावर बारा ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवसम्हणून साजरा केला जातो.युवकांशी निगडीत काही विषयावर चर्चा घडवून आणली जाते.

लिब्सन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ मध्ये पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या परिषदेत १२ ऑगस्ट जागतिक युवा दिवस साजरा करण्याची शिफारस केली गेली.आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले,तेव्हापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवस म्हणून साजरा होतो.

युवा दिवस साजरा करत असताना युवकांशी निगडीत काही,विषय/प्रश्नांची शासकिय आणि युवा पातळीवर चर्चा होणे आवश्यक वाटते.

ष युवक आणि विद्यार्थि संघटना.ष युवक आणि राजकीय संघटनाष युवक आणि सोशल मिडिया.ष युवक आणि राजकारण.ष युवक आणि सामाजिक जाणिवा,जबाबदारी.द्व युवक आणि शेतीव्यवसाय.या संबंधित प्रश्न जाणून घ्यायला हवेत.

महाविद्यालयीन स्तरीय युवकांच्या विद्यार्थी संघटना आहेत. एकेका महाविद्यालयात दोन/तिन/चार अशा संघटना बघायला मिळतात. ह्या संघटना कुठल्या ना कुठल्या पक्षाच्या अधिपत्याखाली कार्य करत असतात. त्यामुळेच पक्षापक्षातील मतभेद ह्याच्यातही पहायला मिळतात. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे, अँडमिशन मधला, मग तो महविद्यालय,होस्टेलमध्ये अँडमिशन,जादा फीस आकारणी कडे लक्ष देऊन विद्यार्थी वर्गाला न्याय मिळवून देणे हे महत्वाचे काम संघटनेचे आहे.पण ह्यांचा अधिकतर वेळ वादातच जातो,बऱ्याच वेळा पोलिसा पर्यंतही वाद जातात. मुंबई, पुणे,दिल्ली, आदि अनेक ठिकाणच्या मागील काही काळात घडलेल्या घटनावरुन दिसते काय आणि किती हिंसक स्वरूप असते ते.

राजकीय पक्षाच्या युवा संघटना,शाखा, आहेत.पण त्यात काही कोट्यावधी संख्येत युवकांचा सहभाग असतो. अगदीच नगण्य युवकांना कुठल्यातरी मंडळावर,सहकारी बँकेवर,जिल्हा परिषद, पंचायत समित्यावर त्यांची वर्णी लागते. त्यातही जवळचे कार्यकर्ते यांनाच संधी दिली जाते. बाकी युवक हे फक्त आधारस्तंभ असतात. त्यांना वापरून घेतले जात असते. हे आधारस्तंभ अधांतरीच असतात. त्यांच्या भवितव्याचा कुठलाही विचार त्यांच्याजवळ नसतो.

आजचा युवक इंटरनेट,मोबाईल, इन्स्टाग्राम, फेसबुक,वाँट्साप,अशा सोशल मिडियाच्या जाळ्यात नको तितका अडकला आहे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.हवा तेवढा उपयोग न घेता,नको तेवढा दुरूपयोग केला जातो. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात युवक त्यात अडकून आत्ममग्न झालाय.चुकीचे दिशेने वापर होतोय.

कलाकार, खेळाडू, सेलीब्रेटीना मोठ्या रकमेचा मोबदला देवून ऑनलाईन गेमच्या जाहिराती केल्या जातात व तरुणांना आकर्षित केले जाते. हे गेम म्हणजे एक जुगारच असतो, तरुणांना विधायक कार्याकडे ओढण्या ऐवजी हे असले प्रकार तरुण पिढीचे दिशा बदलून टाकत आहे. आणि त्यांच्याभोवती अशा गेमचा विळखा घातला गेला आहे. त्यात तरुणपिढी बरबाद होत आहे. या गोष्टीकडे गंभीर पणे बघितले गेले पाहिजे आणि अशा प्रकारांवर बंदी आणायला हवी आहे. अनेक राज्यात यावर बंदी आहे. सरकारला त्याची आवश्यकता वाटत नाही का? युवकांच्या विकासाच्या योजनांचा विचार करत असताना अशा गोष्टींकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

संवाद कमी होतोय.वाचन कमी झालय. काही वेळेला युवकांमध्ये वैचारिक क्षिणता आल्याचे जाणवते.

नविन तंत्रज्ञान मिळतय,सगळं जग जवळ आलय,पण माणसं हरवली आहे. मिडियाचा योग्य वापर करण्याची समज नाही...म्हणून वाटते विधायक वळण द्यायला हवे. राजकीय पक्ष तरूणांचा वापर निवडणूक कामी मोठ्या प्रमाणावर करुन घेतो.त्या बदल्यात काय मिळते? ढाब्यावर मनसोक्त जेवण,अर्थातच खाणे पिणे.महिनादोन महिने फुकट मिळते पण व्यसन कायम चिकटते.यामुळेच खुप मोठा बेरोजगार तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन पुढाऱ्यांमागे धावण्यात आपली उमेदवारी वर्ष वाया घालवतोय. अनेकांचे आयुष्य दिशाहीन झाले आहे.कारण कुठले न कुठले निवडणूका असतातच.रोजगार नसलेला लाखो करोडोच्या संख्येने युवक ह्यात गुरफटला आहे.आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करुन घेतला जातोय ही गंभीर बाब आहे. त्यातच त्याच्या समाजिक जाणिवा लोप पावत आहेत.समाजातला अत्याचार, भ्रष्टाचारा बद्दल त्याला काही घेणे देणे नाही.तो पेटून उठत नाही. त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत. घरातल्या घरात खूनाचे प्रकार घडताय .कुठून आली आहे ही अस्वस्थता? रोजगार नसल्याने फार मोठ्या संख्येने युवक अस्वस्थ आहे.ज्या ठिकाणी संधी उपलब्धता असते,तिथे पोहचत नाही किंवा टिकाव लागत नाही.वैचारिक क्षीणता यायला लागलीय. धुम्रपान,मद्यपानाचे आहारी जात आहे.गुटख्यावर बंदी असूनही अनेक ठिकाणी लाखोंच्या संख्येने साठा पकडला जातो.बार,पब,क्लब, मध्ये युवा पिढी गुरफटत आहे. ड्रग्ज, अमली पदार्थ सेवन वाढते आहे. त्यामुळे युवापिढी बरबाद होतेय ह्याकडे दुर्लक्ष होते आहे.

एकीकडे शेतकरी युवक वर्ग आहे. सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराने तो गांजला आहे.खते,बियाणे,ह्यातही भ्रष्टाचार,बोगस बियाणे अनेक प्रश्नांनी तो ही त्रासला आहे.अनेक वर्षा पासूनचे प्रश्न आहेतच.

वैचारिक क्षीणतेमुळे अनेक युवक आत्महत्त्या करताहेत.

खर तर युवाशक्तित खूप सामर्थ्य नक्कीच आहे.स्वामी विवेकानंदाचे जयंतीलाही राष्ट्रीय युवा दिवस साजरा करतो.त्यांना युवाशक्तिवर खूप विश्वास होता.युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे.त्यांना संस्कारक्षम, कणखर, राष्ट्राप्रती,समाजाप्रती प्रेम,असणारा निर्व्यसनी युवक अपेक्षित होता,आहे.

युवा दिन साजरा करतांना ह्या सर्व गोष्टींची चर्चा,सर्वक्षेत्रातील युवकांना,युवा संघटनांना व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन व्हायला हवी.युवकांची मन की बात ओळखायला हवी.


शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यायला हवा आहे.नवनविन संधी प्राप्त करुन द्यायला हव्यातच. हाच त्यावर एकमेव उपाय आहे.केवळ घरी बसल्या बसल्या बेरोजगारी भत्ता देण्याची योजना न आखता, त्यांच्या हाताला काम देणे महत्त्वाचे आहे.

नाही तर, राष्ट्राची ताकद म्हणून ज्या युवकां कडे आपण पहातो,ती युवापिढी राजकारण, सोशल मिडियाचे, व्यसनाचे,फेऱ्यात बरबाद होणार हे निश्चित.

बेरोजगार, व्यसनाधीन युवकांचा देश व्हायला वेळ लागणार नाही. तशा काही युवकसंघटना चांगले कार्य करत आहेत, असतील,तरी ते खूप तोकडे आहेत.

युवा दिन साजरा करतांना शासनाने-राजकीय नेत्यांनी ह्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यायला हव्या.युवा शक्तिला,युवा संघटनांना विधायक वळण द्यायला हवे हे मात्र नक्की.युवक हेच देशाचे खरे भांडवल आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आणि म्हणूनच त्यांच्या समस्या कडे त्यांना शिक्षणाप्रमाणे रोजगारसंधी मिळेल याकडे लक्ष दिल्यास ,युवकही परदेशी शिक्षणाकडे आकर्षित न होता देशातच राहून आपल्या ज्ञानाचा फायदा देईल यात शंका नाही.

हा दिवस साजरा करत असताना एकूणच युवा पिढीला चांगले शिक्षण योग्य ती दिशा आणि मार्गदर्शन मिळायला हवे.प्रामुख्याने युवा पिढीच्या प्रश्नावर विचार व्हायला हवा. ठिकठिकाणी युवकांचे मेळावे आयोजित करून त्यांचे प्रश्न जाणून घेऊन ते मार्गी लावले पाहिजे. आणि राजकीय स्वार्थासाठी युवक व्यसनाधीन होणार नाही ही दक्षता घ्यायला हवी.



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मो ८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com



अंगारिका चतुर्थी निमित्त श्री क्षेत्र राजुरेश्वर गणपतीच्या दर्शनासाठी जालन्याहून हजारो महिला व पुरुष भाविक पायी वारीने जाताना छायाचित्रात दिसत आहे
(छाया - अनिल व्यवहारे)

# अद्‌भूत बनण्यासाठी जिज्ञासा, संवेदनशीलता व सर्वसमावेशकता गरजेची - निलेश सुराणा

**जालना । प्रतिनिधी -** प्रत्येक व्यक्तीत अद्भुत बनण्याची क्षमता असते; पण आपली भीती, नकारात्मक विचार आणि निराशा आपल्याला थांबवतात. अद्भुत होण्यासाठी केवळ कौशल्य पुरेसे नसून, जिज्ञासा (नवीन शिकण्याची इच्छा), संवेदनशीलता (इतरांच्या भावना समजून घेणे) आणि सर्वसमावेशकता (विविधतेला स्वीकारणे) या गुणांचा विकास करणे आवश्यक आहे, असे मत प्रेरक वक्ते निलेश सुराणा यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ जालना, इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल, अग्रशक्ती बहु मंडळ, रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रल आणि जैन श्वेतांबर सोशल ग्रुप जालना यांच्या संयुक्त विद्यमाने बीइंग औसम म्हणजेच अद्भुत बना या विषयावर श्री. सुराणा यांचे सेंट मेरी शाळेच्या ऑडिटोरियम मध्ये व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी उद्योजक सुनील रायठठ्ठा होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उदय शिंदे उपस्थित होते. व्यासपीठावर रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती, रिता अग्रवाल, वैशाली बंब, पल्लवी अग्रवाल, श्वेता अग्रवाल, ज्योती चोरडिया, डॉ. कीर्ती रूणवाल यांची उपस्थिती होती.



उपस्थितांशी प्रत्यक्ष संवाद साधत श्री. सुराणा म्हणाले की, अतिविचार, अपयशाची भीती आणि आत्मविश्वास कमी होणे हे तीन अदृश्य अडथळे आपल्याला अद्भुत होण्यापासून रोखतात. हे दूर करण्यासाठी आपल्या मनातील जिज्ञासा जागृत करा, विविधतेचा स्वीकार करा आणि इतरांच्या भावनांचा आदर ठेवा. अद्भुत होणे म्हणजे फक्त यश मिळवणे नव्हे, तर आपल्या आजूबाजूला सकारात्मक बदल घडवणे आहे. जिज्ञासू माणूस एखाद्या गोष्टीकडे अनेक वेळा वेगवेगळ्या दृष्टीने पाहतो आणि प्रत्येक वेळी काहीतरी नवीन शोधतो. जिज्ञासेतूनच नवे शोध आणि कल्पना जन्म घेतात. मी, माझे आणि फक्त माझे ही वृत्ती सर्वात मोठी समस्या आहे. दुसऱ्यांच्या भावनांची काळजी घेणे म्हणजेच संवेदनशीलता होय, असे ते म्हणाले. ईर्षा , निराशा, आळशीपणा, लोक काय म्हणतील हा विचार आपल्या प्रगतीच्या मार्गातील सर्वात मोठा अडसर आहे, हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीप्ति सावजी यांनी केले तर शेवटी वर्षा पित्ती यांनी आभार मानले.

# युवा वर्गापुढे टॅरिफ युध्द व पर्यावरणाला वाचविण्याचे मोठे आव्हान!

जगातील संपूर्ण युवकांनी घातक क्षेपणास्त्रे,जैविक हतीयार, प्लास्टिकचा अती वापर, युद्धजन्य परिस्थिती,वाढते धुम्रपान व वाढते प्रदुषण याचा कडाडून विरोध करण्याची वेळ आली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने १७ डिसेंबर १९९९ ला युवा विश्व संम्मेलनाच्या कार्यक्रमात ठरविण्यात आले की प्रत्येक वर्षाच्या १२ ऑगष्टला युवा दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.याप्रमाने पहिल्यांदाच २००० मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांची सुरूवात करण्यात आली. २०१८मध्ये आंतरराष्ट्रीय युवा दिवसांचा थीम होता युवाओं के लिये सुरक्षित स्थान आणि २०१९ मध्ये थीम होता ट्रांस्फोर्मिंग एज्युकेशन परंतु २०२५ चा थीम पृथ्वी को बचाने का प्रयास.हा थीम असायला पाहिजे असे माझे मत आहे.कारण वैश्विक महामारी आणि पृथ्वीचा होत असलेला ह्रास याला युवा शक्तीच वाचवु शकते. संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे.कारण आजच्या परिस्थितीत पृथ्वीतलावर जगात युध्दजन्य परीस्थितीत दीसुन येते.आज प्रत्येक देश एक- मेकावर वरचढ होण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले युक्रेन-रशिया युद्ध, इजरायल-हमास-इरान संघर्ष व तैवान-चीन कटुता यात प्रगती तर नाहीच परंतु विनाश अटळ आहे. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिंपिंग यांनी वुहानमध्ये कोरोणा व्हायरस तयार केला आणि याला संपूर्ण जगात पसरविण्याचे काम सुध्दा चीनने केले.यात लाखोंच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली व करोडोंच्या संख्येने संक्रमीत झाले होते. अमेरीकेने दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी ६ ऑगस्ट १९४५ साली सकाळी ८ वाजुन १५ मि. हिरोशिमा-नागासाकीवर परमाणु बॉम्ब टाकला होता याचे मुख्य कारण तानाशहा हिटलर यांची क्रूरता समाप्त करने होती.परंतु याचे प्रायचीत्य संपूर्ण जापानला भोगावे लागले.यात लाखोंची जीवीत हानीसुध्दा झाली.दिनांक ६ ऑगस्ट या घटनेला ८० वर्षे पूर्ण झाली. परंतु चीनच्या विस्तारवादी नितीला रोखण्यासाठी अमेरीकेसह नाटोसेनेने चायना सी मध्ये चिनला घेरून ठेवले आहे.सोबतच चीन तैवानला नेहमीच युध्दासाठी उकसवीण्याचे काम करीत असतो. परंतु आता जर युद्ध झाले तर तिसरे महायुध्द अटळ आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत रशिया-युक्रेन, अमेरीका - नाटो-चीन,इजरायल-हमास-इराण एकमेकांचे कट्टर शत्रू झाले असून सर्वत्र युद्धजन्य परिस्थिती आहे. कोण केव्हा कोणावर महाविणाशक प्रहार करेल हे सांगता येत नाही व यामुळे अनर्थ केव्हाही उद्भवू शकतो याला नाकारता येत नाही.याला युवावर्गानी कोठेतरी रोखले पाहिजे. कारण चीनने सुपरपावर बनण्यासाठी संपूर्ण हद्द पार केलेल्या आहेत आणि आता डोनाल्ड ट्रम्प टेरिफच्या माध्यमातून जगातील अनेक देशांवर दबाव टाकुन सुपर पॉवरचे वर्चस्व कायम ठेऊन तानाशाह बनण्याचे स्वप्न पाहत आहे. जगातील कोणत्याही देशाचा युवक असो त्याने पशु-पक्षी व मनुष्य प्राणी यांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही अशा पध्दतीचे कार्य अंगीकारले पाहिजे.याकरीता चीनच्या युवकांनी शि.जिंनपिंग यांच्या विनाशकारी बायोवेपन्सचा कडाडून विरोध करून चांगला धडा शिकवला पाहिजे.आज संपूर्ण जगाची धुरा युवकांच्या हाती आहे. मानवजातीचा पृथ्वीतलावर जन्म जनकल्याणासाठी व विकासासाठी झाला आहे.त्यामुळे आजच्या युवकांनी जगाला कोणत्याही परीस्थितीत विनाशापासुन रोखलेच पाहिजे. अन्यथा केव्हाही अनर्थ होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. जर्मनीचा तानाशहा हिटलर यांची कल्पना विस्तारवादाची होती.परंतु त्याचे प्रायचित्य हिरोशिमा -नागासाकीच्या स्वरूपात जापानलाभोगावे लागले. याची पुनरावृत्ती चीन व चीनच्या मित्रराष्ट्रामध्ये होवु शकते याला नाकारता येणार नाही. चीनचे राष्ट्राध्यक्ष शि.जिनपिंग त्याचे विस्तारवादाचे प्रायचीत्य चीनला व त्यांच्या मित्रराष्ट्रांना भोगावे लागेल. त्यामुळे जगातील युवकांनी या युध्दजन्य परीस्थितीला रोखण्यासाठी जागतिक पातळीवर आवाज उठवीण्याची गरज आहे. करोना काळाच्या कठीण प्रसंगात अनेकांची घरे उजाडली, उपासमारी,भुकमरी, बेरोजगारी, महागाई अशा कठीण प्रसंगांना युवकांना व सर्वसामान्यांना तोंड द्यावे लागले होते.आजचा युवावर्ग शारिरीक दृष्ट्या कमजोर असला तरी बुध्दीच्या बाबतीत तर्बेज आणि ताकदवर आहे. त्यामुळे आज कोणत्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी बुध्दीचा योग्य वापर करण्याची वेळ युवकांवर आली आहे.कारण युवाशक्ती भविष्याची पुंजी आहे.याची जोपासना करण्याचे काम अनुभवी पीढीने युवकांना मदत करून केले पाहिजे. आज संपूर्ण जगात निसर्गाचा ह्रास मोठ्या प्रमाणात होत असल्याने मानवजाती व संपूर्ण जीवजंतू भयभीत आहे. त्याचप्रमाणे जगातील प्रत्येक देशांनी आपल्या वर्चस्वासाठी मोठ्या प्रमाणात दारुगोळा, घातक क्षेपणास्त्रे व परमाणु बॉम्ब बनवीले आहे.म्हणजेच आज संपूर्ण पृथ्वी बारुदच्या ढीगाऱ्यावर बसली आहे. त्यामुळे प्रत्येक देश विनाशाकडे वाटचाल करतांना दिसत आहे.परंतु विध्वंसकारी व विनाशकारी प्रवृत्तीला युवावर्ग रोखु शकते. प्रत्येक देशाच्या युवकांनी शांतीचा मार्ग स्वीकारण्याचे ठाणले तर प्रत्येक देशाचे राष्ट्राध्यक्ष व राजकीय पुढारी युवकांच्या मार्गाला चालना देवु शकते.आपण हिरोशिमा-नागासिकाचा विनाश पहाला, ४ ऑगष्ट २020 ला लेबनॉनची राजधानी बेरुतत्यांची पुनरावृत्ती आपण पहाली हा धमाका हिरोशिमा-नागासिकापेक्षा भयानक असल्याचे सांगण्यात येते, युक्रेन -रशिया युध्दामुळे युक्रेन १०० वर्षे मागे गेला आहे, पाकिस्तान आतंकवाद्यांनी भरभटला आहे, बांगलादेश हिंसाचाराने जळत आहे,चीन -तैवानमध्ये युध्दाची ठीणगी केव्हाही उडु शकते, इजरायल -हमास-इराण संघर्ष तिसऱ्या महायुद्धाचे स्वरूप केव्हाही घेवू शकते.म्हणजेच कोणताही दारूगोळा असो त्याचा फक्त एकच मार्ग असतो तो म्हणजे विनाश यात सर्वच भरडल्या जाते मग तो कितीही मोठा बलाढ्य देश असो. त्यामुळे जागतिक विनाशाला युवकांनी कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवु शकतो याला नाकारता येत नाही. सध्याच्या परीस्थितीत युवा शक्ती ही जगासाठी मोठी पुंजी आहे. त्यामुळे सर्वांनीच युवकांना सहकार्य करून जी काही जगात विनाशकारी लीला सुरू आहे तीला ताबडतोब रोखण्याची नीतांत गरज आहे.हे कार्य युवकांच्या शक्तीनेच सफल होवु शकते.युवावर्ग सर्वच क्षेत्रात आमूलाग्र प्रगती करीत आहे यात दुमत नाही. परंतु शि.जिनपिंग व उत्तर कोरियाचा तानाशहा कींग्म जॉन उन सारखे जगाला विनाशाकडे नेत आहे.यांच्यावर नियंत्रण लावने अती आवश्यक आहे. संपूर्ण जगातील युवावर्ग, शिक्षणामध्ये व खेळांमध्ये अग्रेसर आहेत. भारतातील युवावर्ग राष्ट्रीय -आंतराष्ट्रीय खेळांमध्ये अग्रगण्य भुमिका बजावुन देशाची मान उंचावून सन्मानजनक स्थितीमध्ये आहे.याचे संपूर्ण श्रेय युवकांना जाते. देशाचा युवा म्हणजे भारताची आन-बाण-शान आहे. आंतराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने युवकांनी वृक्ष लागवडीकडे लक्ष देवून जास्तीत जास्त वृक्ष लागवडीचा संकल्प केला पाहिजे. कारण पृथ्वीला टीकवुन ठेवायचे असेल तर निसर्ग टिकवून ठेवणे आवश्यक आहे.याकरीता वृक्षलागवड सर्वात मोठा रामबाण उपाय आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थीर रहाण्यास मोठी मदत होईल.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# परतूर दृष्टी लायन्स क्लब महिलांच्या वतीने रक्षाबंधनचा कार्यक्रम

**परतूर । प्रतिनिधी -** दृष्टी लायन्स नेत्रालय क्लब येथील महिलांनी नेत्रालयातील सर्व डॉक्टर, कर्मचारी, रुग्ण यांना व डायलिसिस चालू असताना रुग्णाला राखी बांधून दीर्घ आयुष्य लाभण्यासाठी सर्व लायन्स भगिनींनी शुभेच्छा दिल्या.यानंतर परतुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक,एस.बी. भागवत यांना व पोलीस कर्मचाऱ्यांना लायन्स क्लब च्या महिलांनी राख्या बांधून लायन्स परिवारातर्फे हा रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला होता.याप्रसंगी दृष्टी लायन्स क्लबचे अध्यक्ष, मनोहर खालापूरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना ते बोलत होते रक्षाबंधना सारख्या सणाला त्यांना त्यांच्या बहिणी आणि कुटुंबीयांची आठवण येणे स्वाभाविक आहे.त्यांना थोडाफार घरचा माहोल देण्याचा आमचा हा छोटा प्रयत्न आहे.त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि सर्वांसीबत रक्षाबंधन साजरे करण्याच्या समाधानाने आम्ही भारावून गेलो आहोत.हा उपक्रम केवळ रक्षाबंधन साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता पोलीस दल आणि समाजातील नाते अधिक घट्ट करणारा आहे.यावेळी उपस्थित छाया सोळंके. अध्यक्ष, नीलिमा मसलकर.सचिव,रोहिणी बहिवाल. कोषाध्यक्ष, संजीवनी खालापुरे. शालिनी पिंपळे. नंदाताई सूर्य. डॉ. तेजश्री शिंदे. डॉ. दिपाली पाटील. डॉ. सौरभ शिंदे. डॉ. प्रशांत जाधव.मनोहर खालापुरे.प्रशांत मसलकर. लक्ष्मीकांत दहिवाल. सर्व कर्मचारी व इतरांची उपस्थिती होती.

पान १ वरुन

## महसुलमंत्री बावनकुळेंच्या ...

आदिवासी भूमिहीन कास्तकारांचे शेतीसाठी झालेले अतिक्रमण नियमानुकुलित करून त्यांना सातबारा देण्यात यावा असे शासनाचे आदेश असताना प्रशासकीय स्तरावर आतापर्यंत या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नव्हती आणि म्हणून आंदोलनाच्या माध्यमातून जी भूमिका मांडली त्या भूमिकेला आज रोजी यश आलेलं आहे. कारण महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जो राज्यातील दलित आदिवासी भूमिहीन कास्तकारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविला आहे. जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भूमिहीन कासकारांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे. शिवसेना दलित आघाडीच्या जालना तालुकास्तरीय मेळाव्यास जालना ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने दलित आदिवासी भूमीन कास्तकारांची उपस्थिती होती.

## रोहित पाचफुले ...

आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि परिणामकारक कार्याची दखल घेऊन संस्थेने त्यांचा सन्मान केला. दरम्यान, केंद्रीय मंत्री व पुणे लोकसभा मतदार संघाचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी फोनद्वारे रोहित पाचफुले यांना शुभेच्छा दिल्या.

सन्मान स्वीकारल्यानंतर बोलताना रोहित पाचफुले म्हणाले की, लहानपणापासूनच मला समाजसेवेचे बाळकडू घरातूनच मिळाले. वडील मनोजराव पाचफुले आणि आजोबा निवृत्तीरव पाचफुले यांच्या मार्गदर्शनाने ‘जनतेची सेवा हीच खरी पूजा’ हा संस्कार मनात रुजला. या पुरस्काराने मला अधिक जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळाली आहे. अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था यांनी माझ्या कार्याची दखल घेत ‘आदर्श समाजसेवक २०२५’ हा सन्मान प्रदान केल्याबद्दल मी संस्थेचा आणि उपस्थित मान्यवरांचा मनःपूर्वक आभारी आहे. हा सन्मान माझ्या कुटुंबीयांचा, सहकाऱ्यांचा आणि समाजाचा आहे, ज्यांच्या पाठिंब्याशिवाय हे कार्य शक्य झाले नसते. पुढील काळात समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा माझा प्रयत्न अधिक वेगाने सुरू राहील, असे ते म्हणाले.

- आता मंत्रालयाचं दार सहजपणे ठोठावता येणार नाही. मंत्रालयीन प्रवेशासाठी सरकारने आता ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरू केली असून डिजी प्रवेश पास असल्याशिवाय तुम्हाला मंत्रालयात एंट्री मिळणार नाही. येत्या १५ ऑगस्टपासून ही नवी कार्यप्रणाली लागू केली जात आहे.

# महाराष्ट्रातील कुप्रसिद्ध नेत्यांचा सन्मान करा

अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आधार घेत मी माझे विचार अनिच्छेने मांडले आहेत कारण,एकनाथ शिंदे अजित पवार यांनी फडणवीस च्या नादाला लागून स्वार्थासाठी पक्ष फोडून महाराष्ट्राच्या राजकारणाचा आणि संस्कृतीचा गळाच घोटला आहे.आरोप प्रत्यारोप करताना आपण किती खालच्या दर्जाचे विकृत मनोवृत्तीचे आहोत ह्याचे प्रदर्शन पाहून किळस वाटू लागला.असे प्रकार आपल्या सुसंकृत महाराष्ट्रात कधीच झाले नाहीत. दररोज राजकारणाचा स्तर खाली येत असताना आमच्यासारख्या भावनाशील व्यक्तींना जे पचवणे जड जात होते.मनस्ताप जाणवत होता. तुमच्या स्वार्थी नाकर्तेपणामुळे देशात परदेशात महाराष्ट्राची उज्वल परंपरा कलंकित झाली त्याचा कारण नसताना मनस्ताप आम्ही का सहन करावा. आमची काय चूक ? प्रसारमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या बातम्यामुळे जनतेला हे नेते कशाप्रकारे लुबाडतात ह्याची मती सुन्न करणारी माहिती मिळते.खिशातला एकही रुपया खर्च न होता जनतेच्या कर रूपातून ह्या नेत्यांचे सर्व चोचले पुरवले जातात. सुप्रीम कोर्टाने स्वतःची समिती नेमून जे घोटाळेबाज आहेत त्यांची सखोल चौकशी करून मालमत्ता जप्त करून कठीणातळी कठीण शिक्षा देऊन भ्रष्टाचाराला आळा घालावा. प्रत्येकाच्या वागणुकीप्रमाणे सम्राट पद निर्माण केले त्याला कारणीभूत तुम्हीच आहात.तुमच्यासारखे आणखी मूर्ख भ्रष्टाचारी महाभाग भविष्यात निर्माण होऊ नये हि सदिच्छा.

एकनाथ शिंदे -धोकेबाज गद्दार सम्राट/ अजित पवार = मुतारी सम्राट / अशोक चव्हाण =जागाहडप सम्राट /हर्षवर्धन पाटील = निवांत झोप सम्राट / प्रताप सरनाईक = सरशी तेथे पारशी सम्राट / साटम = टोमणे सम्राट /मनीषा कायंदे = मधमाशी सम्राट /नीलम गोर्हे = एहसान फरामोश सम्राट / चित्रा वाघ = चिचुंद्री सम्राट / माणिकराव कोकाटे = रमीसम्राट,/ धनंजय मुंढे = लफडेबाज सम्राट/,नितेश राणे = वाचाळवीर सम्राट,/ पडळकर = गुंडागर्दी सम्राट/,योगेश कदम - छय्या छय्या सम्राट/,संजय शिरसाट - पैसापेटी सम्राट,/ परिणय फुके = बुद्धीभ्रष्ट सम्राट / गायकवाड -चड्डी बनियान सम्राट /,संजय राठोड -लीग पिसाट सम्राट / राहुल शेवाळे - चुंबाचुंबी सम्राट /,नारायण राणे = बोबडा सम्राट/ गिरीश महाजन = सूडबुद्धी सम्राट / भरत गोगावले -जादूटोणा सम्राट = संदीपान भुमरे = दारू सम्राट,/ किरीट सोमय्या = नागडोबा सम्राट/,मोहित कंबोज = मॅनेज,डीलर सम्राट / संतोष बांगर = धमकी सम्राट / सदाभाऊ खोत = लोचट सम्राट / लोढा = गुटरगु सम्राट / हनी ट्रॅप मधील अधिकारी आणि मंत्री सम्राट / पंकजा मुंढे = चिकी घोटाळा सम्राट /देवेंद्र फडणवीस =सिडको खारघर जमीन /,एलसी/ प्रकाश मेहता = एम.पी. मिल कंपाउंड/सुभाष देशमुख = तूर डाळ /जयकुमार रावल=तोरणमाळ हिल रिसॉर्ट /रावळ बँक / विनोद तावडे = अग्निशमन यंत्र खरेदी / राष्ट्रपुरुष तस्वीर व अर्ली रीडर्स बुक खरेदी / विष्णू सावरा = आदिवासी विद्यार्थी साहित्य खरेदी / गिरीश बापट = अंगणवाडी मोबाईल खरेदी ,सॅनिटरी नॅपकिन / चंद्रकांत पाटील = पुणे जमीन / फडणवीस,चंद्रकांत पाटील,विनायक मेटे =शिवस्मारक एकही वीट न लावता ८० कोटी खर्च / राहुल कुल = भीमा पाटस कारखाना ५०० कोटी कर्ज / अनेक मंत्री नेते आर्थिक घोटाले करून निर्लज्जपणे उजळ माथ्याने जनतेच्या कर रुपी पैश्यावर ऐय्याशी व आर्थिक सुबत्ता करत आहेत. हे सर्व थांबले पाहिजे कि नको ?

वरील सर्व पक्षाशी सोडाच स्वतःशीही निष्ठावान नसलेले व महाराष्ट्राच्या उज्वल संस्कृतीला काळिमा फासणाऱ्या नेत्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहून व्हाईट क्लीन चिट देणारा कपटी,धूर्त, कावेबाज,महाराष्ट्राचं राजकारण कलंकित करणारा शकुनी सम्राट देवेंद्र फडणवीस ह्या सर्वांचा वर जाहीर केलेला पुरस्कार खोटे बोल पण रेटून बोल,दांभिक विश्वगुरू सम्राट नरेंद्र मोदीजीच्या हस्ते सर्वात मोठ्या स्मशानभूमीला सुशोभित करून सन्मान करण्यात यावा.

**यशवंत चव्हाण**
**सीबीडी बेलापूर (नवी मुंबई )**

## विद्युत कॉलनीतील गणपती मंदिरात श्रावण सोमवारी फराळ वाटप

# दिनकर घेवंदे सपत्नीक सन्मानित



**जालना । प्रतिनिधी -** श्रावण महिन्यातील पवित्र सोमवाराचे औचित्य साधून विद्युत कॉलनी येथील गणपती मंदिरात फराळ वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्युत कॉलनीतील सर्व रहिवासी संघ आणि महिला भगिनी म ोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी, दिनकर घेवंदे आणि त्यांच्या पत्नी यांना विशेष निमंत्रित करून त्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला थोरात पाटील, रोहिदास पाटील, काचेवाड सर, पांडुळे साहेब, सुनील लोणकर, भांबरे साहेब, जाधव साहेब यांच्यासह परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्युत कॉलनीतील सर्व रहिवाशांनी विशेष मेहनत घेतली. अशा सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा आणि सलोखा वाढतो, असे मत यावेळी अनेकांनी व्यक्त केले.

## फकीरा वाघ यांच्याकडून शाळेला साऊंड सिस्टीम भेट

**भोकरदन -** जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त फकीरा वाघ यांच्या वतीने जालना शहरातील मुर्गी तलाव येथील महानगरपालिकेच्या शाळेला साऊंड सिस्टीम भेट दिली. राजाभऊ देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून फकीरा वाघ यांच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या हितासाठी व शाळेसाठी फकीरा वाघ यांनी शाळेच्या गरजेनुसार त्यांना साऊंड सिस्टीम भेट दिले. त्यामुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी आनंद व्यक्त केला. त्यामुळे त्यांचे शाळेकडून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अतिक सर, शेख इब्राहिम, वसीम भाई, शामशूद्दीन यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# श्रावण सोमवारनिमित्त आ लोणीकरांचा रुद्राभिषेक

**परतूर । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार माननीय बबनरावजी लोणीकर साहेब यांनी आज मौजे वाटूर येथे जागृत शेषनारायण भगवान यांच्या श्रावण सोमवार निमि त्त मनोभावे रुद्राभिषेक केला.

या पवित्र प्रसंगी श्रीराम मंदिर येथील हरिभक्त परायण गणेश महाराज रामदासी यांच्याकडून आदरणीय लोणीकर साहेबांचा सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी गणपत आबा वारे, सयाजी अण्णा भगस, राधाकिसन आबा माने, राजेंद्र दादा वायाळ, उद्धवराव वायाळ, माधवसिंग जनकवार, संभाजी आप्पा वारे, सुधाकर पडूळकर, विजयराव देशम ुख, पद्माकर कवडे, जगदीश पडुळकर,दत्ताराव जीजा वायाळ, रुस्तुममामा वायाळ, लक्ष्मण काका भगस, अण्णासाहेब वायाळ, सुभाष बप्पा वायाळ, अरुणराव माने, रामकीशनराव सावंत, तसेच इतर मान्यवर ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात वाटूर ग्राम स्थ व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तालुका बुद्धिबळ स्पर्धेत नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व जे बी के विद्यालयचे विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** येथील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती.जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्य.विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धेत यशस्वी कामगिरी करत जिल्हा स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे, युवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे १ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद जालना, यांच्या अंतर्गत तालुका क्रीडा अधिकारी जाफ्राबाद यांच्याद्वारे आयोजित दि.११/८/२०२५. तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत चार विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड झाली.

यात आर्य सुनील वाघ, गौरव भागवत बोराडे, ओमकार संजय कुलकर्णी, कु. वैष्णवी सुरेश साळुंके याचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रीडाविभाग प्रमुख कैलास भूतेकर,मार्गदर्शक राजेश शेवाळे,यांचे मार्गदर्शन लाभले, संस्थेचे अध्यक्ष.संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव. सत्यनारायण सोनी, संचालक मधुकर निकम, विश्वनाथ सांगुळे, प्रा. दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर , प्रदिप काबरा, प्रदिप मुळे, प्राचार्य. एस.बी.बोरकर, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक रामदास भांगे,



प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, रमेश इंगळे, भीवसान ससाने, कैलास भुतेकर, राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, दिनकर उखर्डे,दत्ता उखर्डे, आवटी मॅडम शेख मॅडम पाटील मॅडम, कळंबे मॅडम, भिलावेकर मॅडम प्राध्यापक, शिक्षक, राजू डोमळे,लंबे मॅडम, तसेच नागोराव देशमुख, डीजे तांबेकर, दीपक देशमुख कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.